# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०३/०२/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील गोंडेगाव कनहान येथे दिनांक १०/१०/२०२१ ते दिनांक ०१/०२/२०२२ दरम्यान फिर्यादी नामे– प्रदिप प्रफुल बारई वय ४५ वर्ष, रा. गोडेगाव, कन्हान हे घरी नसतांनी अज्ञात आरोपीने त्यांचे घराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने आलमारीत ठेवलेले सोन्याचे जुने दागिने एकुण किमत ४८,०००/–रू. व घरातील टी.व्ही, घडयाळ, शेगळी किमत ७,०००/–रू. व नगदी १५,०००/–रू. असा एकुण ६०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो.क्र ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील छत्तपूर फार्म हाउस खेडी येथे दिनांक ३१/०१/२०२२ चे ०६.०० वा. ते २०.०० वा. दरम्यान आरोपी नामे– भूरु खान रा. कामठी याने छत्तपूर फार्म हाउस खेडी येथील विवाह समारोह कापेटचे ०८ नग कि.२०,०००/–रु., लोहा चे पिंजरे १५ नग कि. १५,०००/–रु. लोहाचे पाईप २० नग कि. २०,०००/–रु. सजावट सामान कि. ५,०००/–रु. असा एकुण कि. ६०,०००/–रु. चा मुद्देमाल आरोपीने गाडी क्र एम.एच– ४०/बी.एल–४४४८ मध्ये चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शहाबाज इक्बाल खन वय ४१ वर्ष, रा. गंजी पेठ रोड भागल पूरा नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक जावरकर मो.क्र. ९२८४३५७८१८ हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– दिनांक ०२/०२/२०२२ चे १६.०० वा. ते १६.१५ वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय ४१ वर्ष या लघुशंकेकरिता जात असतांना आरोपी नामे– ज्ञानेश्वर दादाजी तळवेकर रा. जागतेश्वर सोसायटी बुटटीबोरी हा आपले मोबाईल फोनवर जोरजोराने अश्लिल भाषेत व ईतर भाषेत फिर्यादी बाजुला असलेल्या शिक्षिका कडे पाहुन बोलत होता. त्यामुळे आरोपीने फिर्यादी व शिक्षिका यांना लज्जा उत्पन करून फिर्यादीचा विनंयभग केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस हवालदार सुषमा धनुष्कार या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**